" Challenges before educated women

# सुशिक्षीत स्त्रियांपुढील आव्हान

आज आर्थिक दृष्टया सुस्थितीत असलेल्या पालकाना प्रामुख्याने आपल्या मुलींचे शिक्षण पुरे करणे शक्य होते. प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण मोठया प्रमाणात सरकारी अनुदानावर म्हणजेच समाजाकडून वसूल केलेल्या करांवर चालते. त्याचा फायदा मात्र मर्यादित वर्गाला मिळतो. अशा शिक्षितांनी आपले सामाजिक ऋण लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. आणि उपलब्ध झालेल्या शिक्षणाची सामाजिक गरजांशी जोड लावणे अगत्याचे आहे.

शिक्षित स्त्रियांनी पुढाकार घेण्याजोगी आजची एक महत्त्वाची गरज म्हणजे एकीकडे समाजामध्ये अनेक स्त्रियांना कामधंदा नाही तर दुसरोकडे स्त्रियांच्या अनेक गरजा भागविल्या जात नाहीत या दुष्ट चक्रातून मार्ग काढणे. शिक्षित स्त्रियांनी पुढाकार घेऊन कमी शिक्षित किंवा अशिक्षित स्त्रियांसाठी व त्यांच्या मुलांसाठी निरनिराळया तऱ्हेची शैक्षणिक मदत व वाचनालयाच्या सोयी उपलब्ध करून दिल्यास शिक्षणाच्या प्रचारास मोठा हातभार मिळेल. कामकरी स्त्रियांवरील घरगुती जबाबदारीचा बोजा काहीसा कमी करण्याच्या दृष्टीने पाळणाघरे, बालवाडया, ' कष्टाची भाकर ' पद्धतीने जेवण तयार करणे, घरात आजार असल्यास वैद्यकीय सल्ला व मदत पुरवणे असे उपक्रम उपयुक्त ठरतील. तसेच कायदेशीर सल्ला, तांत्रिक सल्ला पुरविणे, सहकारी पतपेढी, असे उपक्रम हाती घेता येतील. या उपक्रमातून स्त्रियांना थोडेफार कामही उपलब्ध होईल. परंतु रोजगार निर्माण करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा हाती घेण्यासारखा उपक्रम म्हणजे उत्पादक उद्योग. आज निरनिराळया महिला संस्थांमार्फत महिलांसाठी उद्योगधंदे हाती घेतले जातात. ह्या उद्योगातून कारखानादारांना सुटे भाग पुरविले जातात किंवा खाद्यपदार्थ, शिवणकाम केले तर तयार वस्तू व्यापाऱ्यांच्या हाती जातात व व्यापाऱ्यांचा फायदा जाऊन नंतर वस्तू ग्राहकांपर्यंत पोचतात. त्यामुळे अशा उद्योगांतून स्त्रियांना मजुरी मात्र बेताची मिळते आणि उद्योग चालकांना ' ऑर्डर ' मिळविण्यासाठी बरीच शक्ती खर्च करावी लागते. यातून मार्ग म्हणजे सहकारी ग्राहकसंस्थांना जोडून उत्पादक उद्योगांची उभारणी करावयाची. असे प्रयोग इंग्लंड, युरोपात यशस्वी झाले आहेत. अशा उपक्रमाचे यश सहकार्याचे तत्व ग्राहकसंस्थेतील सर्व ग्राहकांनी काटेकोरपणे पाळण्यावर अवलंबून असते. ग्राहक सभासदांनी महिला संस्थामार्फत पुरविला जाणारा माल ग्राहकसंस्थेतूनच घेतला बाहेरून घेतला नाही तर महिला उद्योगांना निश्चित बाजारपेठ मिळेल. त्याबरोबरच मध्यस्तांना नफा जाणार नाही. अशा रीतीने सहकारी पद्धतीने उत्पादन व वितरण केंद्रे चालविली तर रोजगार उपलब्ध होईल, ग्राहकांचीही सोय होईल व कार्यकर्त्यांमध्ये सहकारी व्यवहाराच्या अनुभवामुळे प्रगलभता येईल.

अशा तऱ्हेचे प्रयत्न फुटकळ किंवा अलगअलग करून तितके परिणामकारक ठरणार नाहीत. तर निरनिराळया प्रश्नांचा एकत्रित विचार होऊन सूत्रबद्ध व नियोजित पद्धतीने हे प्रयत्न होणे श्रेयस्कर. अशा प्रयत्नांमधून तऱ्हतऱ्हेचे निर्णय घेणे, नियोजित उपक्रम व्यवस्थितरित्या पार पाडणे, सल्लासलतीने कामकाज चालविणे आणि सहकार्याने प्रश्न सोडविणे अशा विविध प्रकाराने जबाबदारी उचलण्यास स्त्रिया शिकू शकतील. त्यामुळे तात्कालिक समस्यांना तोंड देतादेता आजच्या संकुचित, आत्मकेंद्री आणि निर्हेतुक चाकोरीतून स्त्रिया बाहेर पडू शकतील. त्यांचा आत्मविश्वास व जबाबदारी घेण्याची कुवत वाढेल. अशी सामाजिक जबाबदारी डोळसपणे स्वीकारली तर समाजातील अन्याय, अत्याचार, दारिद्र, विषमता याची कारणे उकलू लागतील. सर्व स्तरांतर जाणीवा तीव्र होतील आणि समाज परिवर्तन व नव समाज निर्मितीच्या कामामधील स्त्रियांची भागीदारी वाढू शकेल.